सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार - ब

वर्ष १, अंक २७(२) ] बुधवार, मे २७, २००९ ज्येष्ठ ६, शके १९३१ [पृष्ठे ९

किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ८९

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## उच्च व तंत्रशिक्षण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ मे २००९

### आदेश

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४.

क्रमांक राजभ. २००९/(७१/०९)/विशि-२.—विद्यापीठाचे कुलगुरु हे विद्यापीठाचे शैक्षणिक व कार्यकारी प्रमुख असून विद्यापीठाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आणि विद्यापीठाच्या सुसंचालनासाठी विद्यापीठाचे शैक्षणिक कार्यक्रम आणि सर्वसाधारण प्रशासनाच्या विकासासाठी ते जबाबदार आहेत ;

आणि शिक्षणाची उच्च पातळी, उत्तम दर्जाच्या संशोधनास प्रोत्साहन, सहकार्यत्मक व्यवस्थापन, उच्च शिक्षणाचा प्रचार व प्रसार, योग्य तंत्रज्ञान व पायाभूत सोयीसुविधां उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कुलगुरुंनी कार्य करणे आवश्यक आहे ;

आणि राष्ट्रीय व सामाजिक प्राथम्य विचारात घेऊन विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्व घडविण्याची जबाबदारी कुलगुरुंची आहे ;

आणि वरील बाबींच्या अनुषंगाने कुलगुरु पदाचे महत्व विचारात घेता या पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीकडे विहित अशी अर्हता व अनुभव असणे आवश्यक आहे ;

म्हणून महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (१९९४ चा महा. ३५) मधील कलम १२ उपकलम (३क) खंड (घ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या व त्या अंतर्गत येणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून व कुलपती यांचेशी विचारविनिमय करून शासन या आदेशाद्वारे शासन स्पष्ट करीत आहे की :—

(१) कुलगुरु पदासाठी समितीमार्फत शिफारस केल्या जाणाऱ्या व्यक्तीकडे खालील परिशिष्टामधील भाग-अ अनुसार आवश्यक ती शैक्षणिक अर्हता व अनुभव आणि भाग-ब व भाग-क अनुसार ऐच्छिक स्वरुपाचे अनुभव व अपेक्षीत कौशल्य व क्षमता असणे आवश्यक आहे.

(२) परिशिष्टामधील भाग-ड अन्वये अर्ज करण्याच्या पद्धतीबाबत निर्देश दिलेले आहेत.

## परिशिष्ट

### भाग-अ

**आवश्यक अर्हता व अनुभव**

(१) कोणत्याही विद्याशाखेतील डॉक्टरेट आणि शैक्षणिक क्षेत्रातील चांगला पूर्वतिहास (रेकॉर्ड).

(२) विद्यापीठ स्थरावर किंवा नावाजलेल्या संस्थेमध्ये पदवीपूर्व व पदव्युत्तर पातळीवर कमीतकमी १५ वर्षाचा अध्यापन आणि संशोधनाचा अनुभव असावा.

(३) पीएच.डी. नंतर किमान ५ संशोधन पेपर मान्यता प्राप्त अशा आंतरराष्ट्रीय संशोधन जर्नलसमध्ये प्रकाशीत केलेले असावेत आणि/ किंवा मान्यताप्राप्त विद्याशाखेतील गुणात्मक दर्जा असलेली व राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय पातळीवर उच्च शिक्षणसाठी संदर्भग्रंथ म्हणून वापरल्या जातील अशी पुस्तके प्रकाशीत केलेली असावीत.

(४) प्राध्यापकापेक्षा कमी दर्जा नसलेला आणि विद्यापीठातील विभाग प्रमुख/वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य (प्राध्यापक दर्जाचे)/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय ॲडव्हान्स लर्निंग संस्थांचे प्रमुख म्हणून किमान ५ वर्षाचा प्रशासकीय अनुभव.

(५) महत्त्वपूर्ण अशा किमान एका संशोधन प्रकल्पाचे संचलन केलेले असावे.

(६) आंतरराष्ट्रीय संस्था किंवा संघटना यांच्या देशाबाहेरील कार्यशाळा, सेमिनार्स किंवा परिषदांमध्ये सहभागात्मक स्वरुपाच्या कार्याचा अनुभव.

(७) उच्च शिक्षणाशी संबंधीत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कार्यशाळा, सेमिनार, परिषदांचे देशात आयोजनाचा अनुभव.

(८) सप्रमाण नेतृत्वाचा अनुभव.

भाग-ब

ऐच्छिक (इष्ट) अनुभव

(१) विद्यापीठाची सांविधानीक प्राधिकरणावरील (उदा. अभ्यास मंडळ, विद्या परिषद, कार्यकारी परिषद अथवा व्यवस्थापन परिषद, अधिसभा इत्यादी) कार्याचा अनुभव.

(२) दर्जात्मक बाबी, अधिस्विकृती (Assessment), मूल्यनिर्धारण (Accreditation) इत्यादी प्रक्रियांचा प्रत्यक्ष अनुभव.

(३) पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा अनुभव.

(४) महाराष्ट्र विद्यापीठातील अधिनियमातील तरतुदीनुसार विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व राहणीमानाच्या दर्जात सुधारणा होण्यासाठी राज्य किंवा राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थीकेंद्रीत कार्यक्रम राबवण्याचा अनुभव.

भाग-क

अपेक्षित कौशल्य व क्षमता

१. तंत्रज्ञानात्मक कौशल्य —

(अ) तंत्रज्ञानाचा खुलेपणाने अंगिकार करणे आणि त्या तंत्रज्ञानाच्या ज्ञानाधारीत उपयुक्ततेबाबत प्रगट विश्वास ;

(ब) तंत्रज्ञानाच्या वापराबाबत उच्च पातळीवरील हातोटी.

२. व्यवस्थापकीय कौशल्य —

(अ) अपेक्षित घटना व समस्यांवर मात करण्याची व त्यासाठी आधीपासून डावपेचात्मक आराखडा तयार करण्याची योग्यता ;

(ब) संसाधनांची निर्मिती व त्यांचे न्याय्यवाटप करण्याची योग्यता ;

(क) दबावाला न जुमानता परिणामकारकपणे काम करण्याची तसेच कामाचे व्यवस्थापन व उपलब्ध संसाधनाचा कालमर्यादेत वापर करण्याची क्षमता ;

(ड) वित्तीय व्यवस्थापन उदा. उत्पन्न स्त्रोताची निर्मिती, त्यांचे नियोजन व वित्तीय नियंत्रण इ. बद्दलचे प्रगल्भ ज्ञान.

**३. राज्य पातळीवर तसेच राष्ट्रीय पातळीवरील संस्था, व्यावसायिक संघटना इत्यादींशी सहकार्य करार —**

(अ) महत्त्वाच्या क्षेत्रातील समाजाच्या अपेक्षा व गरजा ओळखण्याची क्षमता ;

(ब) राष्ट्रापुढील आव्हानांचे सखोल ज्ञान आणि राष्ट्राच्या विकासात्मक गरजांना उच्च शिक्षण कसे प्रतिसाद देऊ शकेल याबाबतचे ज्ञान ;

(क) अभ्यासक्रमांच्या विकासाबाबत विशेषतः समाजाचा अंतर्भाव व सहभाग विस्तृतपणे वाढविणाऱ्या अभ्यासक्रमांची विशेष जाण ;

**४. नेतृत्व क्षमता —**

(अ) विविध लाभार्थी गटांना उद्युक्त करण्याची अपवादात्मक क्षमता ;

(ब) संघटना/संस्थेचे ध्येय व उद्दिष्ट पुढे नेण्याची प्रबळ इच्छाशक्ती ;

(क) डावपेचात्मक, सृजनात्मकदृष्ट्या व विस्तृतपणे विचार करण्याची क्षमता ;

(ड) स्वउदाहरणाने नवीन कल्पनांचा अंगीकार व त्या संवादात्मक दृष्टीकोनातून राबविण्याची क्षमता ;

**५. संवादात्मक व सहकार्यात्मक कौशल्य —**

(अ) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर परस्पर सहकार्याच्या विकासामध्ये व अंमलबजावणीमध्ये ल्लेखनीय यश ;

(ब) वरीष्ठ पातळीवर, मोठ्या व्यासपीठावर तसेच वैयक्तिक पातळीवर स्वतःच्या सखोल ज्ञानाच्या आधारे परिणामकारकपणे संवाद साधण्याची व मतपरीवर्तन करण्याची क्षमता ;

(क) व्यावसायिक संस्था व संघटनांचे सक्रीय सदस्यत्व ;

भाग-ड

**समितीद्वारे योग्य उमेदवारांचा विचार करण्यासाठी पद्धती.**

(१) शोध समितीने स्वतःच्या किंवा निष्णात शिक्षणतज्ज्ञांच्या शिफारशीनुसार योग्य उमेदवारांचा शोध ा.

(२) याशिवाय समितीकडे प्राप्त अर्जाचा देखील शोध समितीने विचार करावा.

(३) योग्य उमेदवाराने/अर्जदाराने त्याची शैक्षणिक पात्रता, अनुभव तसेच उल्लेखनीय कार्य याबाबत कालक्रमानुसार माहिती द्यावी. याव्यतिरिक्त त्यांनी कुलगुरुपदी निवड होण्यासंबंधीच्या अर्हता पुर्ततेबाबत आणि उमेदवारीच्या समर्थनार्थ सारांश रुपाने स्पष्टीकरण द्यावे, जेणेकरून उमेदवारांची क्षमता/योग्यता तपासण्यासाठी शोध समितीला निवड प्रक्रिया राबवितांना मदत होईल.

(४) शोध समिती पात्र उमेदवारासाठी पात्रता/अटी शिथिल करू शकेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ज. स. सहारिया,
शासनाचे प्रधान सचिव.

# HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 27th May 2009

*ORDER*

MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994

No. Rajabh-2009/(71/09)/VE-2.—Wheras, the Vice-Chancellor of a University is the principal academic and executive officer of the University, and is responsible for development of the academic programmes and general administration of the University for ensuring effciency and good order of the university ;

And whereas, the Vice-Chancellor is required to ensure the highest level of education and encouraging good quality research, collaborative arrangements, extension activities and appropriate technological and infrastructural resource base, etc.;

And whereas, the Vice-Chancellor is required to shape up the overall personality of the students in line with the National and Social priorities ;

And whereas, having regard to the position of the Vice-Chancellor as aforesaid, it is expedient to provide a person being appointed shall possess certain qualifications and experience;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (d) of sub-section (*3A*) of section 12 of the Maharashtra Universities Act. 1994 (Mah. XXXV of 1994) ; and of all other powers enabling it in that, the Government of Maharashtra, in consultation with the Chancellor, hereby.-

(1) specifies that the person being recommended by the Committee shall possess the essential qualifications and experience as set out in part ' A ' of the Scheduled appended hereto; and may possess desirable experience, expected skill and competencies as set out in Part B and part C, respectively of the said Schedule;

(2) directs that the manner in which the application shall be submitted shall be such as set out in Part D of the said Schedule.

*Schedule*

PART 'A'

**Essential Qualification and Experience—**

(1) Earned Doctorate in any discipline and good academic record.

(2) Experience in the field of Higher Education of at least 15 years in teaching and research in a university/well-established institution of repute and/or at the undergraduate and post-graduate level.

(3) Minimum of five research publications in peer-reviewed/referred international research journals after Ph. D and/or published quality books in a recognised discipline, referenced for study in higher education at the National/International level.

(4) At least 5 years of administrative experience in the field of Higher Education not below the rank of Professor and Head of the Department in a university/Principal (in Professor's Grade) of a Senior College/Head of a national/international institution of Advanced Learning.

(5) Execution of at least one major research project.

(6) Experience of working with international bodies or international exposure through participation in workshops, seminars or conferences held outside the country.

(7) Experience of organizing events such as workshops, seminars, conference at an international level within the country in the field of higher education.

(8) Demonstrated experience in leadership.

PART 'B'

**Desirable Experience—**

(1) Experience of working on the Statutory Authorities of a university such as Board of Studies, Academic Council, Management Council or Executive Council of Board of Management, Senate, etc.;

(2) Demonstrable experience of handling Quality issues, assessment and accreditation procedures, etc.;

(3) Experience to guide Ph.D students ;

(4) Experience at the State or national or international level in handling youth development work such as organising student-centric activities for their all-round development and for providing them rich campus life as envisaged in the Maharashtra Universities Act.

PART 'C'

**Expected Skills and Competencies—**

**(1) Technical Skills—**

(i) Openness towards technology and a deep conviction regarding its potential applications in a knowled-based settings ;

(ii) Reasonably high level of comfort in the use of technology ;

**(2) Managerial Skills—**

(i) Ability to anticipate issues and problems and prepare advance strategic plans ;

(ii) Ability to generate resources and allocate the same appropriately ;

(iii) Capacity to work effectively under pressure and manage work and resources within tight deadlines;

(iv) Good understanding of financial management including revenue generation, planning and fiscal control ;

**(3) Alignment with corporate objectives and State as well as National level priorities—**

(i) Ability to identify the needs of the communities in key sectors ;

(ii) Deep understanding of the challenges before the National and how Higher Education can respond to developmental needs ;

(iii) Demonstrable understanding of curriculum development issues, especially those relating to widening participation and social inclusion ;

**(4) Leadership skills—**

(i) Exceptional ability to motivate a divers group of stakeholders ;

(ii) Keen desire to further the mission and goals of the organization ;

(iii) Ability to think strategically and innovatively and maintain a broad perspective ;

(iv) Ability to lead by personal example with openness to new ideas and a consultative approach in implementation of the same ;

**(5) Interpersonal communication and collaborative skills—**

(i) Demonstrable success in developing and executing National and International collaborative arrangements ;

(ii) Ability to interact effectively and persuasively with a strong knowledge-base at senior levels and in large forums as well as on a one-to-one basis ;

(iii) Evidence of being an active member of professional bodies and associations in pertinent fields.

PART 'D'

**Procedure for the Search Committee for considering prospective candidates—**

(1) The Search Committee may identify on its own or on recommendations of eminent academicians the prospective candidates.

(2) Apart from this, the Search Committee may also consider applications received by it.

(3) The prospective candidates/applicants must provide a detailed chronological Resume' that reflects their qualifications, experience and achievements. Additioally, they should provide a summary description of fulfilling the essential requirements and justifying their competency for the position of Vice-Chancellor in the context of the specific skills and competencies listed herein to facilitate the search Committee to judge competency/suitability of the candidate.

(4) The Search Committee may relax any condition in case of deserving candidate.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. S. SAHARIA,

Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.